# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १८ जानेवारी २०२६





## महापालिकेनंतर आता जिल्हा परिषदेचे रणशिंग

**मुंबई** : राज्यातील 29 महानगरपालिकांच्या निवडणुकीचा धुरळा खाली बसत नाही, तोच आता जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. या निवडणुकीसाठी राजकीय पक्षांनी कंबर कसली असून, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने आज आपल्या 40 स्टार प्रचारकांची जंगी यादी जाहीर केली आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी या ही माहिती दिली.

महानगरपालिकांच्या निकालांनी राज्याचे राजकीय वातावरण तापलेले असतानाच आता ग्रामीण भागातील 'मिनी मंत्रालय' मानल्या जाणाऱ्या जिल्हा परिषदांसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने जाहीर केलेल्या या 40 प्रचारकांच्या माध्यमातून पक्ष ग्रामीण भागात आपले वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न करणार आहे. या यादीमध्ये अल्पसंख्याक समाजाचे नेते, महिला प्रतिनिधी आणि युवक नेत्यांचा समतोल साधण्यात आला आहे.

या यादीत उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे आणि ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांचा प्रामुख्याने समावेश आहे. विशेष म्हणजे, अलीकडेच चर्चेत असलेले नवाब मलिक आणि झिशान सिद्दीकी यांनाही स्टार प्रचारक म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे.

प्रमुख स्टार प्रचारक खालीलप्रमाणे:
मंत्रिमंडळातील चेहरे: दिलीप वळसे पाटील, हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे, आदिती तटकरे, संजय बनसोडे, अनिल भाईदास पाटील, नरहरी झिरवाळ आणि धर्मरावबाबा आत्राम.
खासदार: सुनेत्रा पवार आणि नितीन पाटील.
इतर महत्त्वाचे नेते: रूपाली चाकणकर (महिला प्रदेशाध्यक्षा), अमोल मिटकरी, सुरज चव्हाण, समीर भुजबळ आणि शिवाजीराव आढळराव पाटील.

महापालिका निवडणुकांनंतर लगेचच जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका होत असल्याने, ग्रामीण मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसने ताकदवान प्रचार यंत्रणा उभी केली आहे. अनुभवी नेते, संघटनात्मक पदाधिकारी आणि विविध समाजघटकांचे प्रतिनिधी यांचा समन्वय साधत प्रचार अधिक प्रभावी करण्याची रणनिती आखण्यात आली आहे.

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसने स्टार प्रचारकांची यादी जाहीर करत रणांगणात उतरण्याची तयारी पूर्ण केल्याचे स्पष्ट झाले आहे. आगामी काही दिवसांत प्रचाराचा जोर वाढणार असून, ग्रामीण महाराष्ट्रातील राजकारण तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

## संभाजीनगरात १० स्वीकृत नगरसेवकपदांसाठी ५० बंडखोरांना दिलेला शब्द येणार अंगलट

**छत्रपती संभाजीनगर** : महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत अनेक प्रभागांमध्ये पक्षांतर्गत बंडखोरी उफाळून आली होती. ही बंडखोरी रोखण्यासाठी आणि अधिकृत उमेदवारांचा मार्ग मोकळा करण्यासाठी सर्वच पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी अनेक इच्छुकांना निवडणुकीनंतर स्वीकृत नगरसेवक म्हणून तुमची वर्णी लावू, असा शब्द दिला होता. यामध्ये प्रामुख्याने भाजपने १५ ते २०, शिवसेनेकडून १२ ते १५, एमआयएमकडून ८ ते १०, उबाठाकडून ८ ते १० तर काँग्रेस, राष्ट्रवादी, वंचित यांनीदेखील आपल्या कार्यकर्त्यांना स्वीकृत सदस्यपदी घेण्याचा शब्द दिलेला आहे. स्वीकृत सदस्यांची संख्या ५ वरून १० झाली असली तरी इच्छुकांची गर्दी पाहता नेत्यांचा मोठा कस लागणार आहे.

राज्य मंत्रिमंडळाने मुंबई, पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर यांसारख्या मोठ्या महापालिकांमध्ये स्वीकृत सदस्यांची संख्या वाढवण्याचा निर्णय घेतला होता. महापालिकेच्या एकूण सदस्य संख्येच्या १० टक्के किंवा १० सदस्य (यापैकी जी संख्या कमी असेल) इतके स्वीकृत नगरसेवक निवडले जाऊ शकतात, असे राजपत्र २३ मार्च २०२३ रोजी काढलेले आहे. यामुळे काहीशा प्रमाणात नेत्यांना आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना काही प्रमाणात दिलासा मिळणार आहे. सध्याच्या संख्याबळानुसार ५ जागांवर भाजप, ३ जागा एमआयएमला तर शिंदेसेनेला एक स्वीकृत नगरसेवक निवडता येणार आहे. उद्धवसेना, वंचित यांच्याकडे त्या तुलनेत संख्याबळ नाही. स्वीकृत नगरसेवक पदावर संधी मिळावी यासाठी पराभूत उमेदवारांकडूनही फील्डिंग लावली जात आहे.

ज्या अनुभवी कार्यकर्त्यांना किंवा ज्येष्ठ नेत्यांना काही कारणास्तव प्रत्यक्ष निवडणुकीत उतरता आले नाही, त्यांच्यासाठी हे पद राजकीय पुनर्वसन करण्याचे प्रमुख साधन आहे. स्वीकृत नगरसेवक निवडण्यासाठी महापालिका प्रशासनाचा अनुभव, सामाजिक कार्याचा किमान ५ वर्षांचा अनुभव किंवा डॉक्टर, वकील, इंजिनिअर यांसारख्या क्षेत्रातील विशेष पदवी असणे आवश्यक आहे. निवडून आलेल्या नगरसेवकांच्या संख्याबळाच्या प्रमाणात प्रत्येक राजकीय पक्षाला स्वीकृत नगरसेवक पदे दिली जातात. स्वीकृत नगरसेवकांना महापालिकेच्या सभांमध्ये चर्चेत सहभागी होता येते. मात्र त्यांना मतदानाचा अधिकार नसतो आणि ते महापौर पदासाठी उभे राहू शकत नाहीत.

या निवडणुकीत भाजपकडे १४०० पेक्षा अधिक उमेदवारांनी उमेदवारी मागितली होती. शिवसेनेकडे देखील ९०० पेक्षा अधिक उमेदवारांनी अर्ज सादर केले. एमआयएमकडे ७०० पेक्षा अधिक, उद्धवसेनेकडे ६०० पेक्षा अधिक उमेदवारांनी तिकिटाची मागणी केली होती. यातील उमेदवारी न मिळालेल्या शेकडो

लोकांनी बंडखोरी केली. भाजपच्या विरोधात तर मोर्चे, निदर्शने आणि आंदोलन झाले. या सर्वांना पक्षांतील नेत्यांनी स्वीकृत नगरसेवक म्हणून घेऊ, असा शब्द दिला आहे. यामुळे आता हा शब्द पूर्ण करताना नेत्यांना पुन्हा एकदा रोष पत्करावा लागणार आहे.